रविकांत तुपकर करणार सरकारसोबत नवे युद्ध >> पान 2

चार चार महिने पगार नाही, जल जीवन मिशन व स्वच्छ भारत मिशन कर्मचाऱ्यांचा तीव्र आंदोलनाचा इशारा >> पान 3

केंद्रीय राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांच्या प्रयत्नामुळे बुलढाणा जिल्ह्यातील ग्रामीण क्षेत्रातही नव्याने सुरु होणार 10 राष्ट्रीयकृत बँकांच्या शाखा >> पान 4

**सुविचार**

आपली आयुष्याशी असलेली झुंज कधीही न संपणारी असते.

दैनिक

# आपला विदर्भ

apalavidarbhlivenews@gmail.com

मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034

■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 04 ■ अंक 243 ■ रविवार, दि. 12 एप्रिल 2026 ■ पाने 4 ■ किंमत रू. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006



सारा अर्जुननं उज्जैन येथील श्री महाकालेश्वर मंदिराला दिली भेट

आतील पान

## संशयावरून हत्या

फलटण : मुलीशी मोबाईलवर चॅटिंग करत असल्याच्या संशयावरून मुलीच्या नात्यातील चार तरूणांनी केलेल्या जबर मारहाणीत १८ वर्षाच्या मुलाचा मृत्यू झाल्याची घटना फलटण तालुक्यातील ढवळपाटी गावच्या हद्दीत घडली आहे. सोमनाथ जाधव (वय १८), असे मृत मुलाचे नाव असून तो मिऱ्याचीवाडी गावचा रहिवासी होता. याप्रकरणी फलटण ग्रामीण पोलीस ठाण्यात चौघांविरुद्ध खुनाचा गुन्हा नोंद झाला आहे.

## विमानाचे इमर्जन्सी लँडिंग

**लखनौ :** लखनौ येथे आज म्हणजेच शनिवार ११ एप्रिल सकाळी दुबईहून काठमांडूकडे जाणाऱ्या फ्लाय दुबईच्या फ्लाइटचे (एफजेड-११३३) इमर्जन्सी लँडिंग करण्यात आले. काठमांडूमध्ये खराब हवामानामुळे लँडिंगची परवानगी मिळाली नाही, त्यामुळे वैमानिकाने तातडीने लखनौ एअर ट्रॅफिक कंट्रोलशी संपर्क साधून विमान उतरवण्याची विनंती केली. परवानगी मिळताच सकाळी ८:२२ वाजता अमौसी विमानतळावर विमान सुरक्षितपणे उतरवण्यात आले. या फ्लाइटमध्ये एकूण १५४ प्रवासी होते आणि सर्व प्रवासी सुरक्षित असल्याची माहिती अधिकाऱ्यांनी दिली.

## भिवंडीत मेट्रो धावणार

ठाणे : दहिसर-काशीगाव मेट्रोच्या यशानंतर आता ठाणे शहरात धावणाऱ्या 'ऑरेंज लाईन' मेट्रो ५ च्या कामाला मोठी गती मिळाली आहे. गेल्या अनेक वर्षांपासून सुरू असलेल्या ठाणे-भिवंडी मेट्रो प्रकल्पासाठी आता नवी डेडलाईन निश्चित करण्यात आली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, या मेट्रोचे काम येत्या डिसेंबर २०२६ पर्यंत पूर्ण करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. तांत्रिक चाचण्या आणि सर्व सोपस्कार पार पडल्यानंतर, जानेवारी २०२७ मध्ये ही मेट्रो प्रवाशांच्या सेवेत दाखल होण्याची दाट शक्यता आहे. या मेट्रोमुळे ठाणे आणि भिवंडीतील प्रवासाचा वेळ कमालीचा वाचणार आहे.

## ६.०८ कोटी मतदारांची नावे वगळली

नवी दिल्ली : विशेष गहन पुनरावलोकन (एसआयआर) प्रक्रियेनंतर देशातील ९ राज्ये आणि तीन केंद्रशासित प्रदेशांच्या संयुक्त मतदार यादीत मोठी घट नोंदवण्यात आली आहे. या प्रक्रियेनंतर सुमारे ६.०८ कोटी मतदारांची नावे वगळण्यात आली असून एकूण मतदारसंख्या ५१ कोटींवरून ४४.९२ कोटींवर आली आहे.उत्तर प्रदेशने अंतिम मतदार यादी जाहीर केल्यानंतर एसआयआर प्रक्रियेचा दुसरा टप्पा पूर्ण झाला आहे. उत्तर प्रदेश, पश्चिम बंगाल, तामिळनाडू, राजस्थान, छत्तीसगड, केरळ, गुजरात, मध्य प्रदेश, गोवा तसेच पुदुचेरी, अंदमान-निकोबार आणि लक्षद्वीप या केंद्रशासित प्रदेशांच्या अंतिम मतदार याद्या प्रकाशित करण्यात आल्या आहेत. बिहारमध्ये ही प्रक्रिया यापूर्वीच पूर्ण झाली होती.




# भुजबळ थोडक्यात बचावले

## – हेलिपॅड समजून भुजबळांच्या हेलिकॉप्टरचं पुण्यातील पार्किंग लॉटमध्ये लँडिंग
## – पायलटची गंभीर चूक, थोडक्यात अनर्थ टळला



दैनिक आपला विदर्भ

**पुणे । प्रतिनिधी :** राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते आणि अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ यांच्या हेलिकॉप्टर लँडिंगवेळी गंभीर प्रकार घडल्याचे समोर आले आहे. हेलिपॅड समजून पायलटने चक्क कार पार्किंग लॉटमध्ये लँडिंग केल्याचं पाहायला मिळत आहे. सुदैवाने छगन भुजबळ यांच्यासह हेलिकॉप्टरमधील सर्वजण सुखरुप आहेत.

राष्ट्रवादीचे नेते आणि कॅबिनेट मंत्री छगन भुजबळ यांच्या हेलिकॉप्टरचे लँडिंग करताना पायलटकडून मोठी चूक झाल्याचे समोर आले आहे. पुरंदर तालुक्यातील खानवडी येथे महात्मा फुले यांच्या जयंतीनिमित्त आयोजित भव्य कार्यक्रमाला उपस्थित राहण्यासाठी भुजबळ हे नाशिकहून पुण्याला येत होते. यावेळी गावात हेलिकॉप्टर लँडिंगसाठी हेलिपॅड तयार करण्यात आलं होतं. परंतु कार पार्किंग लॉटमध्ये मोकळी जागा पाहून तिथेच हेलिपॅड असल्याचा पायलटचा गैरसमज झाला आणि त्याने तिथे लँडिंग केल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे. सुदैवाने कुठलाही अनुचित प्रकार न झाल्याने सर्वजण सुखरुप आहेत.

## छगन भुजबळ हेलिकॉप्टर अपघात प्रकरणाची चौकशी होणार – मुख्यमंत्री

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई । प्रतिनिधी :** राज्याचे अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ यांच्या हेलिकॉप्टरच्या अपघाती लँडिंगबाबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी प्रतिक्रिया दिली आहे. पुरंदरमध्ये मंत्री छगन भुजबळ सुरक्षित आहेत, पण पायलटचा निष्काळजीपणा उघड झाला आहे. प्रसारमाध्यमांशी बोलताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्पष्ट केले की, या संपूर्ण घटनेची चौकशी नक्की केली जाईल.



राज्याचे अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ यांच्या हेलिकॉप्टरच्या लँडिंगबाबत पुरंदरमध्ये एक धक्कादायक आणि तितकाच थर-ारक प्रकार समोर आला आहे. महात्मा फुले यांच्या जयंतीनिमित्त खानवडी येथे आयोजित कार्यक्रमाला जात असताना, पायलटने हेलिकॉप्टर हेलिपॅडवर न उतरवता चक्क वाहनांच्या पार्किंगमध्ये उतरवले. या प्रकारामुळे उपस्थित पोलीस आणि प्रशासकीय अधिकाऱ्यांची मोठी धाव-पळ उडाली असून, सुदैवाने मोठा अनर्थ टळला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, क्रांतीज्योती महात्मा जोतिराव फुले यांच्या जयंतीनिमित्त पुरंदर तालुक्यातील खानवडी येथे अभिवादन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमासाठी छगन भुजबळ हेलिकॉप्टरने येणार होते. प्रशासनाने खबरदारीचा उपाय म्हणून खानवडी गावात त्यांच्या लँडिंगसाठी सर्व निकष पाळून सुरक्षित ठिकाणी हेलिपॅड तयार केले होते.

## आशा भोसले रुग्णालयात दाखल, ICU मध्ये उपचार सुरू

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई । प्रतिनिधी :** ज्येष्ठ पार्श्वगायिका आशा भोसले यांना शनिवारी संध्याकाळी (११ एप्रिल २०२६) प्रकृती अस्वास्थ्यामुळे मुंबईतील ब्रीच कँडी रुग्णालयात दाखल करण्यात आले. 'माझी आजी आशा भोसले यांना प्रचंड थकवा आणि छातीच्या संसर्गामुळे रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. त्यांच्यावर उपचार सुरू आहे', अशी माहिती आशा भोसलेंची नात जनाई नात यांनी इन्स्टाग्रामद्वारे दिली.

शनिवारी संध्याकाळी ९२ वर्षीय आशा भोसलेंना रुग्णालयात दाखल करण्यात आले. आशा भोसलेंच्या प्रकृतीची विचारपूस करण्यासाठी भाजपा आमदार आणि सांस्कृतिक मंत्री आशिष शेलार ब्रीच कँडी रुग्णलयात पोहोचले. 'मी आशा भोसलेंच्या कुटुंबियांची भेट घेत प्रकृतीची विचारपूस केली. डॉक्टरांशी भेट होऊ शकली नाही', असे शेलार यांनी पुढारी न्यूजला सांगितले. तर एका इंग्रजी वृत्तपत्राला ब्रीच कँडीमधील सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार श्वसनाचा त्रास झाल्याने त्यांना रुग्णालयात नेण्यात आले.


दरम्यान, जनाई भोसलेंनी पोस्टद्वारे सर्व चाहत्यांना आवाहनही केले आहे. 'कृपया आमच्या प्रायव्हसीचा आदर करावा, अशी आम्ही विनंती करतो.सर्व काही ठीक होईल, अशी आम्हाला आशा आहे. तसेच या संदर्भात आम्ही तुम्हाला लवकरच माहिती देऊ' असेही त्यांनी पोस्टमध्ये म्हटले आहे.

## कामाच्या ठिकाणी महिला सहकाऱ्याकडे एकटक पाहणे गुन्हेगारी स्वरूपाचे नाही

### उच्च न्यायालयाचा महत्वपूर्ण निर्वाळा

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई । प्रतिनिधी :** कामाच्या ठिकाणी महिला सहकाऱ्याच्या शरीराकडे एकटक पाहणे अनैतिक असले तरी ते भारतीय दंड संहितेच्या कलम ३५४-सी अंतर्गत 'व्हॉयरिझम'चा गुन्हा ठरत नाही, असा महत्वपूर्ण निर्वाळा उच्च न्यायालयाने दिला. हा निर्वाळा देत न्यायालयाने एका वरिष्ठ अधिकाऱ्याविरुद्धचा एफआयआर रद्द केला.अशा वर्तनावर कंपनीच्या अंतर्गत समितीमार्फत कारवाई होऊ शकते, परंतु ते गुन्हेगारी स्वरूपाचे नाही, असे निरिक्षण न्यायालयाने नोंदवले.



न्यायमूर्ती अमित बोरकर यांच्या एकलपीठाने हा निर्णय दिला. न्यायालयाने एका विमा कंपनीच्या कार्यकारी अधिकाऱ्याविरुद्ध दाखल करण्यात आलेला एफआयआर रद्द केला आणि कायद्याचा विस्तार स्पष्ट शब्दांपलीकडे करता येत नाही. खटला पुढे चालवणे हा कायदेशीर प्रक्रियेचा गैरवापर ठरेल, असे न्यायालयाने नमूद केले. तक्रारदार महिलेच्या म्हणण्यानुसार, मिटींगदरम्यान आरोपी नजरेला नजर न देता तिच्या शरीराच्या अवयवांकडे एकटक पाहत असे आणि असभ्यपणे टिप्पणी करीत असे. कंपनीच्या अंतर्गत तक्रार समितीने (आयसीसी) या प्रकरणात यापूर्वीच आरोपीला निर्दोष ठरवले होते. या प्रकरणाची सविस्तर सुनावणी घेतल्यानंतर न्यायालयाने महत्वपूर्ण निरिक्षणे नोंदवली.

कायदेशीर तरतूद परनिरीक्षणाच्या गुन्ह्याची व्याख्या करते आणि त्यासाठी शिक्षा देते. यात एखाद्या स्त्रीच्या खाजगी कृत्यादरम्यान तिला पाहणे, तिची छायाचित्रे घेणे किंवा ती प्रसारित करणे यांचा समावेश होतो. महिलेच्या शरीराचे खाजगी अवयव उघडे असतात, स्त्री स्वच्छतागृहाचा वापर करत असते, किंवा सार्वजनिक ठिकाणी सहसा न केले जाणारे लैंगिक कृत्य करत असते, अशा परिस्थितींना कायदेशीर तरतूद लागू होते. मात्र कार्यालयीन ठिकाणी महिलेकडे एकटक पाहणे हे गुन्हेगारी श्रेणीत येत नाही, असे न्यायालयाने स्पष्ट केले.

## स्कूल बसचे भाडे आता सरकार ठरवणार : प्रताप सरनाईक

### वाहनाचे लाईव्ह ट्रॅकिंग, पालकांना अलर्ट जाणार

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई । प्रतिनिधी :** शालेय विद्यार्थ्यांचा प्रवास अधिक सुरक्षित करण्यासाठी राज्य सरकारने कठोर पावले उचलली आहेत. शालेय बसच्या भाडेवाढीला चाप लावत आता प्रादेशिक परिवहन प्राधिकरण स्कूल बसचे भाडे निश्चित करणार असून, पालकांकडून एकरकमी आगाऊ रक्कम घेण्यास मनाई करण्यात आली आहे. 'महाराष्ट्र मोटार वाहन (शालेय बस नियमन) (प्रथम सुधारणा) नियम, २०२६' या सुधारित नियमावलीचा मसुदा गृह विभागाने प्रसिद्ध केला असून, यावर १५ दिवसांत हरकती व सूचना नोंदवण्याचे आव-ाहन परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी केले आहे. अनेक शाळा आणि बस कंत्राटदार पालकांकडून वर्षभराचे भाडे आगाऊ घेतात. नव्या नियमानुसार आता केवळ मासिक भाडेच आकारता येईल. तसेच, प्रत्येक शाळेत 'स्कूल ट्रान्सपोर्ट कमिटी' स्थापन करणे अनिवार्य असून, ही समिती भाडे आणि तक्रारींचे निवारण करेल. या समितीला दर तीन महिन्यांनी आपला अहवाल सादर करावा लागेल.

विद्यार्थ्यांच्या सुरक्षेसाठी आता केवळ सीसीटीव्ही पुरे-से नसून, प्रत्येक बस आणि व्हॅनमध्ये जीप-ाएस आधारित 'व्हेईकल लोकेशन ट्रॅकिंग डिव्हाईस' आणि पॅनिक बटण बसवणे बंधनकारक असेल. वाहनाचे लाईव्ह ट्रॅकिंग, विद्यार्थ्यांची डिजिटल उपस्थिती आणि स्वयंचलित अलर्ट पालकांना मिळणार आ-हेत. बसेसमध्ये अग्निसुरक्षा यंत्रणा आणि सर्व प्रवाशांसाठी सीट बेल्ट अनिवार्य करण्यात आले आहेत.



महिला परिचारिकांची सक्ती

पूर्व-प्राथमिक ते पाचवीपर्यंतच्या विद्यार्थ्यांच्या प्रवासादरम्यान प्रत्येक बसमध्ये महिला परिचारिका किंवा नियुक्त कर्मचारी असणे बंधनकारक असेल. विद्यार्थ्यांची बसमध्ये चढताना आणि उतरताना वेळेसह नोंद ठेवावी लागणार आहे. तसेच, विशेष गरजा असलेल्या (दिव्यांग) मुलांसाठी प्रशिक्षित कर्मचारी आणि सुलभ प्रवेश व्यवस्थेची तरतूद मसुद्यात करण्यात आली आहे. - त्याशिवाय चालक आणि वाहकांचे पो-लीस व्हेरिफिकेशन आणि वैद्यकीय प्रमाणपत्र अनिवार्य करण्यात आले आहे. हा नियम लागू झाल्यानंतर तीन महिन्यांत बदल न केल्यास वाहनाचा परवाना थेट रद्द होणार आहे. शिक्षण आणि परिवहन विभाग संयुक्तपणे बसेसची तपासणी करून जिल्हा समितीला अहवाल देणार आहे.

## विधानपरिषद सभापती प्रा. राम शिंदे यांच्या पुढाकाराने

# कर्जत-जामखेडमध्ये डिजिटल शैक्षणिक क्रांती

### १३ एप्रिल रोजीच्या लोकार्पण सोहळ्यास मुख्यमंत्र्यांची ऑनलाईन उपस्थिती

---

### एकूण ३४३ जिल्हा परिषद शाळांना ९ कोटी ६४ लाख २७ हजार रुपये खर्चाचे डिजिटल साहित्य



दैनिक आपला विदर्भ

**मुंबई । प्रतिनिधी :** ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांचा शैक्षणिक विकास आणि त्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा स्वीकार हे उद्दिष्ट्य डोळ्यासमोर ठेऊन महाराष्ट्र विधानपरिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे यांनी आपल्या स्थानिक विकासनिधीतून कर्जत आणि जामखेड तालुक्यातील जिल्हापरिषद शाळांमध्ये डिजिटल शिक्षण सुविधा उपलब्ध करुन दिली आहे. सोमवार दि. १३ एप्रिल, २०२६ रोजी सकाळी १०.०० वाजता या अभियानाअंतर्गत १४० शाळांमध्ये ६५ इंची इंटरऍक्टिव्ह पॅनल, ई-लर्निंग सॉफ्टवेअर, वायरलेस की-बोर्ड व माऊस आणि ऑफलाइन यूपीएस असे शैक्षणिक साहित्य लोकार्पणाचा सोहळा होणार आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस दूरदृश्यप्रणालीद्वारे यावेळी उपस्थित राहणार आहेत.

एकूण ९ कोटी ६४ लाख २७ हजार रुपये इतक्या निधीचे डिजिटल शैक्षणिक साहित्य उपलब्ध करुन देण्यात येत आहे. कर्जत तालुक्यात एकूण शाळांची संख्या २६६ असून सन २०२२-२३ मध्ये ४१, सन २०२४-२०२५ मध्ये १०० आणि सन २०२५-२०२६ मध्ये ८४ अशा एकूण २२५ शाळा तर जामखेड तालुक्यात एकूण शाळांची संख्या १७३ असून तेथे सन २०२२-२३ मध्ये ३०, सन २०२४-२०२५ मध्ये २८ आणि सन २०२५-२०२६ मध्ये ५६ अशा एकूण ११४ शाळांमध्ये आणि अहिल्यानगरमध्ये ०४ याप्रमाणे एकूण ३४३ शाळांमध्ये डिजिटल शैक्षणिक संच वाटप करण्यात येत आहे.

या सोहळ्यास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, विधानपरिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे, अहिल्यानगर जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील, ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे, ग्रामविकास विभागाचे प्रधान सचिव एकनाथ डवले, शालेय शिक्षण विभागाचे प्रधान सचिव वेणुगोपाल रेड्डी, अहिल्यानगरचे जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया, अहिल्यानगर जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी तसेच शाळांचे मुख्याध्यापक, शिक्षकवृंद आणि विद्यार्थीवर्ग, पालक, शालेय व्यवस्थापन समिती पदाधिकारी व गावातील प्रतिष्ठित नागरिक उपस्थित राहणार आहेत.

या अभियानामुळे शिक्षक आणि विद्यार्थ्यांमध्ये आनंद आणि उत्साहाचे वातावरण असून दृक-श्राव्य माध्यमातून अत्याधुनिक, रंजक व सुलभ शिक्षण पद्धती उपलब्ध होत आहे. शिक्षकांच्या अध्यापन कौशल्यात वाढ होईल आणि विद्यार्थ्यांचा शैक्षिणिक सहभाग, आत्मविश्वास वाढण्यास हातभार लागेल. आधुनिक शिक्षणाच्या संधी ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनाही प्राप्त होत असल्याने ग्रामीण आणि शहरी अशी दरी कमी होऊन स्पर्धात्मक युगात समान संधी प्राप्त होईल. या सोहळ्यात शैक्षणिक संच प्राप्त झालेल्या १४० शाळांमधील विद्यार्थी, शिक्षक, पालक आणि नागरिक सहभागी होणार आहेत.

## थकबाकीचा प्रश्न निकाली निघावा

राज्यातील वीज वितरण क्षेत्रात मोठा बदल घडवणारा निर्णय घेत मंत्रिमंडळाने महावितरण कंपनीच्या विभाजनाला मंजुरी दिली आहे. या निर्णयानुसार सुमारे ४५ लाख कृषिपंपधारक ग्राहकांसाठी एमएसईबी सोलर ॲग्रो पॉवर लिमिटेड ही स्वतंत्र कंपनी स्थापन करण्यात येणार आहे. मात्र, या निर्णयामुळे महावितरणच्या ९० हजार कोटींच्या प्रचंड थकबाकीचा प्रश्न सुटणार का, याबाबत अद्यापही अनिश्चितता कायम आहे. राज्यात २००५ पूर्वी एकच राज्य विद्युत महामंडळ कार्यरत होते. कार्यक्षमता वाढवण्यासाठी त्याचे विभाजन करून महावितरण, महानिर्मिती आणि महापारेषण या तीन स्वतंत्र कंपन्या निर्माण करण्यात आल्या. परंतु गेल्या दोन दशकांत महावितरणवर सुमारे ९० हजार कोटी रुपयांहून अधिक वीजबिलांची थकबाकी जमा झाली आहे. त्याचबरोबर कंपनीवर जवळपास तितकेच कर्जही आहे. या आर्थिक अडचणींमुळे वित्तीय संस्थांकडून कर्ज मिळवताना कंपनीला अडथळ्यांचा सामना करावा लागत आहे. याचा अर्थ तीन कंपन्या स्थापन करताना ठेवलेले उद्दिष्ट पूर्ण न होता आता आणखी एक कंपनीचा घाट घालण्यात येत आहे आणि त्याला कोणाचा आक्षेप नाही. कॅगसारखी यंत्रणा असताना देखील याबद्दल काही जाब विचारला जातो की नाही? हा प्रश्नच आहे. शिवाय वीज दराच्या बाबतीत निर्णय होताना वीज नियामक आयोगात जी चर्चा, आक्षेप, सुनावणी होते त्यातून उत्तरदायी यंत्रणेने काही उपाय केले की नाही? हे प्रश्न अनुत्तरीतच राहतात. या पार्श्वभूमीवर महावितरणची बॅलन्स शीट सुधारण्यासाठी सरकारने कृषी ग्राहक वेगळे करण्याचा निर्णय घेतला आहे. कृषिपंपधारक ग्राहकांसाठी स्वतंत्र कंपनी स्थापन केल्यास मुख्य कंपनीवरील आर्थिक ताण कमी होईल, तसेच भविष्यात शेअर बाजारात नोंदणी करून निधी उभारण्याचा मार्ग मोकळा होईल, असा सरकारचा अंदाज आहे. मात्र, याच ठिकाणी सर्वात मोठा प्रश्न उपस्थित होतो तो म्हणजे सध्याच्या ९० हजार कोटी रुपयांहून अधिक थकबाकीचा. ही थकबाकी कोणाच्या खात्यावर राहणार? तिची वसुली कोण करणार? नव्या कंपनीवर हा बोजा टाकला जाणार की महावितरणकडेच ठेवला जाणार, याबाबत स्पष्टता नसल्याने तज्ञ आणि कामगार संघटनांमध्येही संभ्रमाचे वातावरण आहे. सरकार या विषयावर कंपनी स्वतंत्र आहे असे बोट दाखवू शकते. मात्र त्यातून प्रश्न सुटत नाही. केवळ पळवाट मिळते. या वाटेने सरकार आणि यंत्रणा अजून किती काळ पळ काढणार आहे? वीज क्षेत्रातील जाणकारांच्या मते, केवळ कंपनीचे विभाजन करून आर्थिक समस्या सुटणार नाहीत. महावितरणची कार्यपद्धती, बिल वसुली यंत्रणा आणि ग्राहकांमध्ये असलेली बिल न भरण्याची मानसिकता यामध्ये सुधारणा करणे आवश्यक आहे. वीज ग्राहक शेतकरी कृषी वीज बिल भरण्यास अनुत्सुक आहे अशातला भाग नाही. उलट त्यांना त्यांच्या वेळेत पुरेशी आणि सलग वीज मिळत नाही ही राज्याची तक्रार आहे. वीज चोरी आणि वीज गळती दोन्हीला ग्रामीण विद्युतीकरण जबाबदार दाखवून अनेकवर्षे स्वतःची सुटका करून घेतली आहे. वैशिष्ट्या म्हणजे या वीज चोरी आणि वीज गळतीमध्ये हजारो कोटी रुपयांचा घोटाळा आहे असा आरोप खुद्द विद्रद्यमान सत्ताधारी भाजपचे नेतेच विरोधी पक्षात असताना करत होते. माधव भांडारी यांनी या विषयावर रान उठवले होते. विद्यमान मुख्यमंत्र्यांनी तत्कालीन सरकारला सळो की पळो करून सोडले होते. पण, आज त्यांची भूमिका काय? हे स्पष्ट होत नाही. गंमत अशी की, महाराष्ट्र वीज नियामक आयोगानेदेखील यापूर्वीच कृषी ग्राहकांसाठी स्वतंत्र कंपनी स्थापन करण्याचे निर्देश दिले होते. म्हणजे आयोगातील मंडळीही आधीच मत बनवून बसलेली आहेत. कृषी फीडर आधीच वेगळे करण्यात आले असून, या प्रक्रियेमुळे वीजदर नियंत्रणात ठेवण्यास मदत होईल, असा दावा सरकारकडून करण्यात येत आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना काही प्रमाणात दिलासा मिळण्याची अपेक्षा सरकारी आणि अधिकाऱ्यांकडून व्यक्त होत आहे! थकबाकीबद्दल मात्र त्यांचे मौन अचंबित करणारे आहे. दरम्यान, मंत्रिमंडळाने राज्यात इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान व कृत्रिम बुद्धिमत्ता विभाग स्थापन करण्यालाही मंजुरी दिली आहे. या निर्णयानुसार विद्रद्यमान माहिती तंत्रज्ञान संचालनालयाचे रूपांतर करून नवीन आयुक्तालय उभारले जाणार आहे. या विभागासाठी एकूण ७७ नवीन पदांची निर्मिती करण्यात येणार असून, मंत्रालय आणि इतर विभागांत ४२७ पदांचा स्वतंत्र आयटी संवर्ग तयार केला जाणार आहे. तसेच प्रकल्प व्यवस्थापन आणि देखरेखीसाठी तांत्रिक स्वरूपातील ३८९ पदांची भरती बाह्य यंत्रणेद्वारे केली जाणार आहे. या सर्व पदनिर्मितीसाठी सुमारे १३३ कोटी रुपयांच्या वार्षिक खर्चास मंजुरी देण्यात आली आहे. याशिवाय, महाराष्ट्र रिमोट सेन्सिंग ॲप्लिकेशन सेंटरचेही स्वरूप बदलण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. सध्या सोसायटी कायद्यांतर्गत नोंद असलेल्या या संस्थेची कंपनी म्हणून पुनर्नोंदणी केली जाणार आहे. १९८८ मध्ये स्थापन झालेल्या या केंद्राचा वापर भू-स्थानिक तंत्रज्ञानाच्या साहाय्याने नियोजन आणि निर्णय प्रक्रियेत केला जातो. पुणे आणि मुंबई येथे त्याची उपकेंद्रे कार्यरत आहेत. एकूणच, राज्य सरकारने घेतलेले हे निर्णय प्रशासनिक आणि आर्थिक दृष्टीने महत्त्वाचे आहेत. पण, एकीकडे खासगी कर्मचारी नेमून खर्चात बचत आणि दुसरीकडे ९० हजार कोटीच्या थकितकडे दुर्लक्ष अशी विचित्र स्थिती आहे. महावितरणच्या थकबाकीचा प्रश्न सुटल्याशिवाय या बदलांचा अपेक्षित परिणाम कितपत होईल याचा विचार निरर्थकच !

# रविकांत तुपकर करणार सरकारसोबत नवे युद्ध

## महाबळेश्वर येथील राज्यस्तरीय बैठकीत केली घोषणा, दोन दिवसीय प्रशिक्षण शिबिरात वैचारिक मंथन

दैनिक आपला विदर्भ

**महाबळेश्वर । प्रतिनिधी :** सध्या आखाती देशांमध्ये युद्धाचे सावट आहे. या युद्धाची झळ अनेक देशांना बसत आहे. अशातच महाराष्ट्रातही एक नवे युद्ध छेडण्याचा इशारा युवा नेते रविकांत तुपकर यांनी दिला आहे.

सरकारने जाहीर केलेली कर्जमाफी ही अत्यंत तोकडी असून अन्यायकारक आहे. सरकारने शेतकऱ्यांना वाऱ्यावर सोडले आहे. सध्या शेतकऱ्यांना कोणीच वाली उरला नाही त्यामुळे क्रांतिकारी शेतकरी संघटनेच्या राज्यभरातील मावळ्यांना प्रशिक्षणाच्या माध्यमातून नवी ऊर्जा देण्यात आली असून आता शेतकऱ्यांच्या विविध मागण्यांसाठी राज्यभर नव्याने तीव्र आंदोलन उभारणार असल्याची घोषणा क्रांतिकारी शेतकरी संघटनेचे संस्थापक अध्यक्ष रविकांत तुपकर यांनी केली आहे. महाबळेश्वर येथे नुकत्याच पार पडलेल्या दोन दिवसीय प्रशिक्षण शिबिर व राज्यस्तरीय बैठकीच्या समारोप प्रसंगी ते बोलत होते. महाबळेश्वर तालुक्यातील तापोळा येथे नुकतेच ८ व ९ एप्रिल दरम्यान क्रांतिकारी शेतकरी संघटनेच्या राज्यभरातील निवडक पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांचे दोन दिवसीय प्रशिक्षण शिबिर पार पडले.

या शिबिराला राज्यभरातील विविध जिल्ह्यांमधील प्रमुख पदाधिकारी व कार्यकर्त्यांची प्रचंड उपस्थिती दिसून आली. यावेळी समारोपीय सत्रात बोलताना रविकांत तुपकर म्हणाले की, महाराष्ट्र सरकारने जाहीर केलेली कर्जमाफी आम्हाला मान्य नाही. ही कर्जमाफी अत्यंत तोकडी असून अन्यायकारक आहे.

सरकारने शेतकऱ्यांना कोणतीही अट न लावता सरसकट पाच लाख रुपये कर्जमाफी द्यावी व रेगुलर कर्ज भरणाऱ्या शेतकऱ्यांना दीड लाखाचे प्रोत्साहनपर अनुदान द्यावे अशी आमची मागणी आहे. सोबतच सोयाबीन, कापूस, ऊस,कांदा, द्राक्ष, आंबा, चिकू, धान आदी उत्पादनाला शासनाने उत्पादन खर्चावर आधारित भाव द्यावा, भारत अमेरिका व्यापारी करार रद्द करावा यासह शेतकऱ्यांच्या विविध मागण्यांसाठी आम्ही सरकारला पंधरा दिवसांचा अल्टिमेटम देत आहोत त्यानंतर राज्यभरात क्रांतिकारी शेतकरी संघटनेच्या वतीने तीव्र आंदोलन करण्यात येईल असा इशारा देखील यावे रविकांत तुपकर यांनी दिला.

शेतकऱ्यांच्या आणि जनसामान्यांच्या बाजूने बोलायला सध्या कोणी तयार नाही सर्व सत्तेसाठी हपापले आहेत, शेतकरी आणि सर्वसामान्यांचा आवाज मांडण्याचा जो कोणी प्रयत्न करेल त्याला दाबण्याचे काम सरकार करत आहे.

इडी व इतर यंत्रणांचा वापर करून सरकारच्या विरोधात बोलणाऱ्यांना जाणीवपूर्वक दाबले जात आहे ही परिस्थिती या राज्यासाठी आणि देशासाठी चांगली नाही. इंदिरा गांधींनी आणलेल्या आणीबाणी पेक्षाही अत्यंत घातक परिस्थिती सध्या देशात आणि राज्यात दिसून येत आहे. त्यामुळे आता शेतकऱ्यांनी एकजूट दाखवण्याची नितांत गरज आहे. शेतकऱ्यांसाठी व सर्वसामान्य जनतेसाठी रक्ताच्या शेवटच्या थेंबापर्यंत लढण्याची माझी तयारी आहे त्यासाठी क्रांतिकारी च्या सगळ्या मावळ्यांनी मला साथ देणेदेखील तेवढेच गरजेचे आहे.

आता राज्यभरात संघटना बांधणीचा उपक्रम हाती घेतला जाईल मी स्वतः राज्यभर दौरा करून संघटनात्मक बांधणी करणार आहे. राज्यभरात काही नवीन नियुक्त्या देखील केल्या जाणार आहेत जे जुने पदाधिकारी निष्क्रिय आहेत त्यांना बदलून त्यांच्या जागी नवे पदाधिकारी नियुक्त केले जातील आणि राज्यभरात क्रांतिकारी च्या मावळ्यांची सशक्त अशी फौज तयार केली जाईल असे यावेळी रविकांत तुपकर यांनी सांगितले. ८ एप्रिल रोजी या प्रशिक्षण शिबिराला सुरुवात झाली तर ९ एप्रिल रोजी या शिबिराचा आणि राज्यस्तरीय बैठकीचा समारोप करण्यात आला.

दरम्यान हे दोन दिवशीय प्रशिक्षण शिबीर मोठ्या उत्साहात आणि चैतन्यमय वातावरणात पार पडले. सह्याद्री पर्वतरांगेच्या कुशीत आणि निसर्गाच्या सानिध्यात ताजे तवाने होऊन आणि नवी ऊर्जा घेऊन कार्यकर्ते बाहेर पडले. ८ एप्रिल रोजी पहिला सत्राचे उद्घाटन इंद्रजीत देशमुख यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी त्यांनी अतिशय मौल्यवान असे मार्गदर्शन कार्यकर्त्यांना केले. दुसऱ्या सत्रात सामाजिक कार्यकर्त्या ॲड वर्षाताई देशपांडे यांनी उपस्थितांशी संवाद साधला तर तिसऱ्या सत्रामध्ये व्हॉइस ऑफ मीडिया या पत्रकारांच्या जागतिक स्तरावरील संघटनेचे संस्थापक अध्यक्ष संदीप काळे यांनी आपल्या भाषणातून उपस्थित पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांमध्ये नवी चेतना निर्माण केली.

मोटिवेशनल स्पीकर प्रा. गणेश शिंदे, इंदौर वरून आलेल्या स्वातीताई काशीद, कोल्हापूर चे शेतकरी नेते वैभव कांबळे, शेतकरी नेते शिवाजी माने, क्रांतिकारी संघटनेचे विदर्भ प्रमुख तथा देवळीचे नवनिर्वाचित नगराध्यक्ष किरण ठाकरे,गजानन अमदाबादकर,ॲड शर्वरी सावजी -तुपकर, तथा व्हॉइस ऑफ मीडियाचे राष्ट्रीय अध्यक्ष अनिल म्हस्के, अरविंद पवार आदींचे मार्गदर्शन यावेळी लाभले. प्रशिक्षण शिबिरानंतर प्रत्येक जिल्हाध्यक्षांनी या शिबिराचा अनुभव आणि त्यांची भूमिका विशद केली.

या दोन दिवशीय प्रशिक्षण शिबिरातील आणि राज्य कार्यकारिणीच्या बैठकीतील एकंदरीत सर्व चर्चा आणि पदाधिकाऱ्यांच्या भावना आणि त्यांच्या सूचना समजून घेत रविकांत तुपकर यांनी आपल्या समारोपीय भाषणात संघटनेची सविस्तर भूमिका आणि दिशा मांडली.






### येणारा काळ क्रांतिकारीचा असेल : संदीप काळे

माझे सर्वच राजकीय पक्षातील वरिष्ठ नेत्यांची चांगले संबंध आहेत. सत्ताधारी आणि विरोधातील अनेक नेत्यांसोबत माझी उठ बस आहे परंतु मी आजवर कोणत्याच पक्षाच्या स्टेजवर गेलो नाही, मात्र रविकांत तुपकरांचे काम हे तळागाळातील जनतेसाठी आहे. विचार आणि उद्दिष्ट घेऊन चालणारी ही संघटना आहे त्यामुळे या संघटनेच्या व्यासपीठावर येण्याच धाडस मी आज केले आणि यापुढेही करत राहील असे प्रतिपादन यावेळी प्रसिद्ध लेखक, संपादक तथा व्हॉइस ऑफ मीडिया या पत्रकारांच्या जागतिक संघटनेचे संस्थापक अध्यक्ष संदीप काळे यांनी यावेळी बोलताना केले.

क्रांतिकारी शेतकरी संघटना ही ज्वलंत विचारांची आणि सळसळत्या रक्ताच्या तरुणाईची संघटना आहे. शेतकरी चळवळीची धार आता बोथट झाली आहे येणारा काळ शेतकऱ्यांसाठी, सर्वसामान्यांसाठी अतिशय जिकरीचा आणि संकटाचा आहे आणि या काळात क्रांतिकारी शेतकरी संघटनाच ठामपणे उभी राहून शेतकऱ्यांच्या आणि सर्वसामान्यांची बाजू मांडू शकते. येणारा काळात क्रांतिकारी संघटना ही राज्यातील सर्वात मोठा दबाव गट ठरेल त्यामुळे येणारा काळ क्रांतिकारीचा आहे असा विश्वास देखील यावेळी संदीप काळे यांनी व्यक्त केला.

### असा हिरा पुन्हा मिळणार नाही : अनिल मस्के

रविकांत तुपकर हे केवळ नेतृत्व नसून शेतकरी चळवळीतील एक वैचारिक वादळ आहे. गेल्या ३० वर्षात या नेत्याने घरादारावर तुळशीपत्र ठेवून केवळ शेतकरी चळवळीसाठी आणि शेतकऱ्यांसाठी काम केले आहे. आंदोलन केले,उपोषण केले, रास्ता रोको केला, स्वतःला गाडून घेतले, जेलमध्ये गेला, पोलिसांचा मार खाल्ला, तडीपार झाला..अगदी जीवाची पर्वा न करता आजवर हा माणूस शेतकऱ्यांसाठी लढत आला आहे, असं नेतृत्व सहज घडत नाही. त्यामुळे आपला नेता कार्यकर्त्यांनी तळ हातावरच्या फोड्याप्रमाणे जपला पाहिजे. सत्तेसाठी आमदारकी आणि खासदारकीसाठी या नेत्याने आपल्या विचारांशी आणि शेतकरी चळवळीशी कधीच तडजोड केली नाही. शेतकरी चळवळ काही वेळ बाजूला ठेवली असती आणि तडजोड केली असती तर कधीचाच आमदार -खासदार होऊन हा नेता सत्तेत बसला असता परंतु शेतकरी चळवळीत घडलेला हा बाव्वनकशी हिरा आहे आणि असा हिरा पुन्हा होणे शक्य नाही त्यामुळे या नेत्याला राज्यभरातील कार्यकर्ते व पदाधिकाऱ्यांनी जपलं पाहिजे आणि ताकद दिली पाहिजे असे आवाहन यावेळी वव्हॉइस ऑफ मीडियाचे राष्ट्रीय अध्यक्ष अनिल म्हस्के यांनी केले.

# नोकरीमध्ये शिस्तबद्ध सर्जनशीलता महत्त्वाची; परिसंवादातील सूर

## प्रशासकीय महिला अधिकाऱ्यांचे पहिले अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन – २०२६





दैनिक आपला विदर्भ

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था** :प्रशासकीय सेवेतील कठोर शिस्त आणि साहित्यातील सृजनशीलता यांचा सुवर्णमध्य साधत आपली प्रशासकीय सेवा केली असल्याचे मत आज महिला अधिकाऱ्यांनी आपले अनुभव 'परिसंवादा'च्या माध्यमातून मांडले. निमित्त होते नवी दिल्लीतील महाराष्ट्र सदन येथे आयोजित 'प्रशासकीय महिला अधिकाऱ्यांच्या पहिल्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे.

सरहद (पुणे) आयोजित आणि महाराष्ट्र सदन ,नवी दिल्ली व मराठी भाषा विभाग,महाराष्ट्र शासन यांच्या सहकार्याने आयोजित करण्यात आलेल्या या संमेलनातील पहिल्या सत्रात 'अडथळ्यांपलीकडचे कर्तृत्व: शासकीय सेवेतील महिला कर्तृत्वाची वाटचाल' या विषयावर रंगलेल्या परिसंवादाने उपस्थितांची मने जिंकली.

भारतीय नागरी लेखा सेवेतील () वरिष्ठ अधिकारी सुप्रिया देवस्थळी यांनी प्रशासकीय कसरत आणि 'प्राधान्यक्रम' यावर भाष्य केले. ''घर आणि कार्यालयाचा समतोल राखणे हे केवळ महिलांचेच कर्तव्य आहे, हा सामाजिक दृष्टिकोन बदलणे गरजेचे आहे, असे त्या म्हणाल्या. महिलांनी 'अपराधीपणाची भावना' () बाजूला सारून मुलांच्या संगोपनात त्यांना आपल्या कामाच्या 'इकोसिस्टम'ची ओळख करून द्यावी, जेणेकरून ते अधिक सक्षम होतील, असेही त्यांनी नमूद केले.

भारतीय विदेश सेवेतील अधिकारी वल्लारी गायकवाड यांनी आंतरराष्ट्रीय स्तरावरील अनुभवांचे पदर उलगडले. मेक्सिको आणि स्पेनमध्ये भारताचे प्रतिनिधित्व करताना आलेले अनुभव सांगताना त्यांनी एआय आणि सायबर डिप्लोमसी यांसारख्या आधुनिक आव्हानांवर प्रकाश टाकला. मेक्सिकोतील भारतीय क्रांतिकारकांच्या ऐतिहासिक वारशाचा उल्लेख करत त्यांनी आपल्या कामात 'व्हॅल्यू ॲड' करण्याचे महत्त्व अधोरेखित केले.

नौदलातील साहसी प्रवासाचा उलगडा करताना, नागरी संरक्षण संचालनालयातील अधिकारी राजेश्वरी कोरी यांनी सुरक्षेच्या मुद्द्यावर भर दिला. युद्धनौकेवर नियुक्त होणाऱ्या उपखंडातील पहिल्या महिला अधिकारी म्हणून त्यांचा प्रवास थक्क करणारा आहे. संकट काळ कधीही लिंगभेद पाहत नाही, त्यामुळे महिलांनी स्वतःच्या सुरक्षेबाबत अधिक सजग राहणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन त्यांनी केले.

या महत्त्वपूर्ण परिसंवादाचे सूत्रसंचालन डॉ. सोनाली फुले आणि निवेदिता खांडेकर यांनी केले.

DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

# चार चार महिने पगार नाही, जल जीवन मिशन व स्वच्छ भारत मिशन कर्मचाऱ्यांचा तीव्र आंदोलनाचा इशारा

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा। प्रतिनिधी :** जिल्हा पाणी व स्वच्छता मिशन कक्षा अंतर्गत जल जीवन मिशन व स्वच्छ भारत मिशन या विभागात कार्यरत १२०० कंत्राटी कर्मचाऱ्यांचे मागील सुमारे चार महिन्यांपासून मानधन थकीत असल्याने संताप व्यक्त केला जात आहे. याबाबत वारंवार निवेदने देऊनही शासनाकडून कोणतीही ठोस कार्यवाही न झाल्याने आता कर्मचाऱ्यांनी आंदोलनाचा इशारा दिला आहे.

जल जीवन मिशन तसेच स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण) अंतर्गत जिल्हा व तालुका स्तरावर कार्यरत कर्मचाऱ्यांचे डिसेंबर २०२५ ते मार्च २०२६ या कालावधीतील चार महिन्यांचे मानधन प्रलंबित आहे. तसेच स्वच्छ भारत मिशन अंतर्गत कर्मचाऱ्यांचे तीन महिन्यांचे मानधनही थकीत आहे. या संदर्भात संबंधित कृती समितीने शासनाला अनेक वेळा निवेदने देऊन, तसेच विविध बैठकींमधून मानधन तात्काळ अदा करण्याची मागणी केली होती. मात्र अद्याप कोणतीही ठोस कार्यवाही न झाल्याने कर्मचाऱ्यांमध्ये नाराजीचे वातावरण आहे.

कृती समितीच्या निवेदनानुसार, २५ एप्रिल २०२६ पर्यंत थकीत मानधन अदा न झाल्यास राज्यस्तरीय कामबंद आंदोलन पुन्हा छेडण्यात येणार आहे. तसेच मुंबई येथील आझाद मैदानावर आंदोलन, विभागीय कार्यालयांसमोर धरणे व आवश्यक असल्यास आमरण उपोषण करण्याचा इशाराही देण्यात आला आहे.

याशिवाय ८ एप्रिल २०२६ पासून जिल्हा स्तरावर काळ्या फिती लावून कामकाज करण्यात येत असून, २० एप्रिलपासून असहकार आंदोलन सुरू करण्याचा निर्णयही कर्मचाऱ्यांनी घेतला आहे. दरम्यान, जल जीवन मिशन व स्वच्छ भारत मिशन या महत्त्वाकांक्षी योजनांमध्ये कार्यरत कर्मचाऱ्यांना वेळेवर मानधन न मिळाल्यास योजनांच्या अंमलबजावणीवर परिणाम होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. त्यामुळे शासनाने तात्काळ दखल घेऊन प्रलंबित मानधन अदा करावे, अशी मागणी संबंधित कर्मचाऱ्यांकडून करण्यात येत आहे. यावर पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग महाराष्ट्र शासन काय भूमिका घेते. याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

> पाणीपुरवठा व स्वच्छता विभागात गेल्या दोन वर्षापासून मानधन वितरणामध्ये प्रचंड मोठ्या प्रमाणात अनियमितता व गोंधळ निर्माण झालेला आहे. तो सोडवण्यासाठी मंत्रालय स्तरावरून कुठलाही प्रयत्न केला जात नाही ती खेदाची बाब आहे. चार - चार महिन्यापासून जिल्हा व तालुका स्तरावरील कर्मचाऱ्यांचे मानधन प्रलंबित असताना मर्जीतल्या संस्थांना प्रशिक्षणासाठी कोट्यावधीचा रुपयाचा निधी दोन्ही योजनांमध्ये मंजूर केला जात आहे. ही खेदाची बाब आहे. १२ फेब्रुवारी २०२६ रोजी मॅट, छत्रपती संभाजी नगर व दिनांक ३० मार्च २०२६ रोजी राज्य मानवी हक्क आयोगाने तात्काळ प्रलंबित मानधन अदा करण्याबाबत सूचना देऊन सुद्धा राज्य शासनाला याची दखल घ्यावीशी वाटत नाही. ही पुरोगामी महाराष्ट्रामध्ये व संविधानाने स्वीकारलेल्या कल्याणकारी राज्याच्या संकल्पनेमध्ये प्रशासनाला न शोभणारी बाब आहे. सदरील प्रकरणात मा. मुख्यमंत्री यांनी लक्ष देऊन हा प्रश्न सोडवावा ही विनंती.
> रमाकांत गायकवाड, कंत्राटी कर्मचारी ,कृती समिती अध्यक्ष



हर घर जल
जल जिवन मिशन

## महत्त्वाचे...

### आता थेट 'एनआयए' आणि 'सीबीआय' करणार बड्या रॅकेटचा पर्दाफाश!

दैनिक आपला विदर्भ

**नाशिक । प्रतिनिधी :** नाशिकमधील एका नामांकित बहुराष्ट्रीय आयटी कंपनीत सुरू असलेल्या लैंगिक शोषण आणि धर्मांतराच्या काळ्या कारभारावर पोलिसांनी अखेर हातोडा टाकला आहे. या प्रकरणाचे गांभीर्य ओळखून पोलिसांनी अत्यंत गोपनीयरीत्या राबवलेल्या 'स्पेशल ऑपरेशन'मध्ये एका मोठ्या सेक्स रॅकेटचा पर्दाफाश करण्यात यश मिळवले आहे.

आंतरराष्ट्रीय किंवा आंतरराज्य रॅकेट असण्याचा संशय :

अशातच आता या प्रकरणाचा अधिक तपास करण्यासाठी आता राज्याच्या पोलिसांनंतर केंद्रीय तपास यंत्रणा या मैदानात उतरण्याची दाट शक्यता निर्माण झाली आहे. या संपूर्ण प्रकरणामागे एक मोठे आंतरराष्ट्रीय किंवा आंतरराज्य रॅकेट असण्याचा संशय बळावला असून, त्यामुळेच आता केंद्रीय यंत्रणांच्या तपासाची टांगती तलवार संबंधित दोषींवर असणार आहे.

या प्रकरणाचा तपास करणाऱ्या विशेष तपास पथकाने आतापर्यंत गोळा केलेली अत्यंत महत्त्वाची आणि खळबळजनक माहिती एनआयए, एटीएस आणि सीबीआय या तिन्ही प्रमुख यंत्रणांना कळवली आहे. केवळ कामाच्या ठिकाणचे लैंगिक शोषणच नाही, तर त्यामागे विशिष्ट हेतूने केलेले धर्मांतरण आणि त्यातील आर्थिक व्यवहारांचे धागेदोरे मोठे असण्याची चिन्हे आहेत. एसआयटीने दिलेल्या या माहितीमुळे आता केंद्रीय स्तरावर या प्रकरणाची दखल घेतली जात आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, या आयटी कंपनीत महिलांना विविध आमिषे दाखवून किंवा त्यांच्यावर दबाव टाकून त्यांचे शोषण केले जात होते. या प्रकरणाचा तपास करत असताना तपासी अधिकाऱ्यांच्या हाती काही धक्कादायक पुरावे लागले आहेत, जे एखाद्या मोठ्या गुन्हेगारी साखळीकडे निर्देश करतात. यामुळेच स्थानिक पातळीवरील तपासासोबतच आता राष्ट्रीय स्तरावरील यंत्रणांनी यात लक्ष घालणे आवश्यक असल्याचे मानले जात आहे. येत्या काही दिवसांत या प्रकरणाचा तपास अधिकृतपणे या केंद्रीय यंत्रणांकडे वर्ग होण्याची शक्यता असून, यामुळे नाशिकसह संपूर्ण आयटी क्षेत्रात मोठी खळबळ उडाली आहे.

### 'तू सिंगल आहेस' म्हणत कंत्राटी सुरक्षा रक्षकाकडून मुलीचा विनयभंग, फलटण उपजिल्हा रुग्णालयातील धक्कादायक घटना

दैनिक आपला विदर्भ

**सातारा । प्रतिनिधी :** महिला डॉक्टरच्या आत्महत्या प्रकरणाची राळ खाली बसते ना बसते तोच फलटण उपजिल्हा रुग्णालयात उपचार घेणाऱ्या मुलीचा विनयभंग झाल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. 'तू सिंगल आहेस, आनंदी राहायला हवं', असं म्हणत रुग्णालयातील कंत्राटी सुरक्षा रक्षकाने मुलीच्या गळ्यात हात घालून विनयभंग केलाय. याप्रकरणी पीडित मुलीच्या तक्रारीवरून पोलिसांनी त्याला चौकशीसाठी बोलावल्याची माहिती पोलीस निरीक्षक अरविंद काळे यांनी दिली.



रुग्णालयातील वॉर्डमध्ये केला विनयभंग : फलटण शहर पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, तक्रारदार मुलगी फलटण उपजिल्हा रुग्णालयात उपचार घेत आहे. गुरूवारी (९ एप्रिल) रात्री ९ वाजण्याच्या सुमारास मुलीच्या ओळखीचा अभिषेक अशोक सोडमिसे (रा. सोमंथळी, ता. फलटण) हा तिच्या वॉर्डमध्ये आला. त्यावेळी तिची आई जेवणाचा डबा आणण्यासाठी बाहेर गेली होती. मुलीसोबत कोणी नसल्याची संधी साधून तो मुलीची चौकशी करत तिच्या बेडवर बसला. बोलत बोलत त्यानं मुलीच्या गळ्याला हात घालून 'तू सिंगल आहेस, आनंदी राहायला हवं', असं म्हणत तिचा विनयभंग केल्याची महिती पोलीस निरीक्षक अरविंद काळे यांनी दिली.फलटण उपजिल्हा रुग्णालयातील रुग्णांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर : या प्रकारामुळं मुलीच्या मनात लज्जा आणि भीती निर्माण झाली. तिनं अभिषेक सोडमिसे या तरुणाविरूद्ध फलटण शहर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करून कारवाईची मागणी केली आहे. पोलीस सध्या या घटनेचा तपास करत आहेत. दरम्यान, सातत्याने फलटण उपजिल्हा रुग्णालयात वादग्रस्त घटना घडत असताना वैद्यकीय यंत्रणेकडून रुग्णालयाच्या शिस्तीकडं दुर्लक्ष होत आहे. त्यामुळं रुग्णांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. त्यावर लवकरात लवकर उपाय करावा अशी मागणी जनतेतून होत आहे.

# राजधानीत महात्मा ज्योतिराव फुले यांना जयंतीनिमित्त अभिवादन





दैनिक आपला विदर्भ

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** थोर समाजसुधारक महात्मा ज्योतिराव फुले यांच्या जयंतीनिमित्त आज राजधानीत त्यांना विनम्र अभिवादन करण्यात आले. महाराष्ट्र सदनाच्या प्रांगणातील महात्मा फुले यांच्या पुतळ्यास निवासी आयुक्त तथा सचिव आर. विमला यांनी पुष्पांजली अर्पण करून अभिवादन केले.

याप्रसंगी महाराष्ट्र सदनाच्या विशेष आयुक्त श्वेता सिंघल, महाराष्ट्र परिचय केंद्राचे संचालक हेमराज बागुल, सहायक निवासी आयुक्त नितीन शेंडे, सहाय्यक निवासी आयुक्त स्मिता शेलार, जनसंपर्क अधिकारी मनीषा पिंगळे, सहायक लेखाधिकारी निलेश केदारे आणि महाराष्ट्र सदनाचे व्यवस्थापक प्रमोद कोलपते यांच्यासह अन्य अधिकारी व कर्मचाऱ्यांनीही त्यांच्या पुतळ्यास पुष्प अर्पण करून आदरांजली वाहिली.

## सारा अर्जुननं उज्जैन येथील श्री महाकालेश्वर मंदिराला दिली भेट

हैदराबाद : आदित्य धरच्या 'धुरंधर' चित्रपटात यलिनाची भूमिका साकारणारी अभिनेत्री सारा अर्जुननं उज्जैनच्या महाकालेश्र्वर मंदिराला भेट दिली आहे. अभिनेत्रीचे शिव मंदिरातील फोटो सोशल मीडियावर व्हायरल झाले आहेत. दरम्यान सारा अर्जुननं भस्म आरतीमध्ये भाग घेतला. यावेळी तिनं गुलाबी रंगीची साडी नेसली होती. यात ती खूप सुंदर दिसत होती. आदित्य धरच्या चित्रपटात रणवीर सिंगची पत्नी यलिनाची भूमिका साकारणाऱ्या अभिनेत्रीनं आपला अद्भुत अनुभव सांगितला. तिनं म्हटलं, माझ्याकडे खरंच शब्द नाहीत. मला बोलावल्यासारखे वाटले आणि मी इथे आले. या जगात यापेक्षा चांगली भावना नाही. मी खूप आनंदी आहे. मला खूप आनंद होत आहे.

पुढं तिनं सांगितल की, मी सर्वांच्या प्रगतीसाठी प्रार्थना करते. दरम्यान सोशल मीडियावर व्हायरल झालेल्या व्हिडिओमध्ये अभिनेत्री शिव भक्तीमध्ये तल्लीन झाल्याची दिसत आहे. तसेच सारा अर्जुनला तिच्या 'धुरंधर २' चित्रपटातील भूमिकेमुळं खूप पसंत केलं गेलं आहे. रणवीर सिंग आणि सारा अर्जुन यांच्या प्रमुख भूमिका असलेला हा चित्रपट सुपरहिट झाला आहे. या चित्रपटानं बॉक्स ऑफिसवर धमाकेदार कमाई केली आहे. या चित्रपटानं जगभरात १६८० कोटींचा व्यवसाय केला. हा चित्रपट आताही चांगली कामगिरी बॉक्स ऑफिसवर करत आहे. 'धुरंधर २'नं अनेक चित्रपटाचे विक्रम मोडले आहेत.

सारा अर्जुननं बालकलाकार म्हणून सिनेसृष्टीत चित्रपट कारकिर्दीला सुरुवात केली. 'धुरंधर चित्रपटातील तिच्या कामाचं खूप कौतुक करण्यात आलं. आदित्य धर दिग्दर्शित 'धुरंधर' आणि 'धुरंधर: द रिव्हेंज' या चित्रपटांमध्ये तिनं खूप उत्तम अभिनय केला आहे. दरम्यान या चित्रपटानंतर साराला अनेक मोठ्या बजेटच्या, चित्रपटांची ऑफर आली आहेत. या यादीमध्ये अभिनेत्री मधुबालाच्या बायोपिकचा समावेश आहे. तसेच संजय लीला भन्साळी मधुबालावर बायोपिक बनवत असल्याचं समजत आहे.

# बिहारमध्ये बस अन् पिकअपचा भीषण अपघात; १० जणांचा मृत्यू, अनेक गंभीर

कटिहार : बिहारमधील कटिहार इथं एक भीषण रस्ते अपघात घडला. शनिवारी संध्याकाळी बस आणि पिकअपची समोरासमोर धडक होऊन झालेल्या अपघातात सुमारे १० जणांचा मृत्यू झाला. तर अनेक नागरिक या अपघातात गंभीर जखमी झाले आहेत. मृतांचा आकडा वाढण्याची शक्यता आहे. अपघातातील जखमींवर रुग्णालयात उपचार सुरू आहेत.



कटिहारमध्ये भीषण रस्ते अपघात : बस आणि पिकअपचा भीषण अपघात राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ३१ वर काईरा पोलीस ठाण्याच्या हद्दीत बसगडा चौकाजवळ झाला. घटनास्थळावरून मिळालेल्या माहितीनुसार, पिकअप व्हॅनमधले नागरिक एका धार्मिक कार्यक्रमातून घरी परतत होते. यावेळी भरधाव वेगानं येणाऱ्या एका बसनं पिकअपला जोराची धडक दिली. ही धडक इतकी जोरदार होती की, अपघातात पिकअप वाहन चक्काचूर झाले. यात अनेक लोकांचा जागीच मृत्यू झाला.

जखमींवर रुग्णालयात उपचार सुरू : राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ३१ वर झालेल्या अपघातामध्ये अनेकांचा जागेवर मृत्यू झाला. त्यानंतर स्थानिकांनी कोईरा पोलीस ठाण्याला या घटनेची माहिती दिली. या घटनेची माहिती मिळताच पोलीस घटनास्थळी दाखल झाले. यानंतर पोलिसांनी स्थानिकांच्या मदतीनं जखमींना उपचारासाठी जवळच्या रुग्णालयात दाखल केलं. तसंच अपघातातील मृतदेह ताब्यात घेऊन शवविच्छेदनासाठी पाठवले.

बस चालकावर दारू प्यायल्याचा आरोप : बस चालकानं दारू प्यायली होती. तो महामार्गावर खूप भरधाव वेगानं वाहन चालवत होता. त्याच्या चुकीमुळं अपघात झाला. या घटनेसाठी बस चालकच पूर्णपणे जबाबदार आहे, असं रहिवासी दिलीप कुमार यांनी सांगितलं.

अपघातानंतर जनतेचा संताप : अपघातानंतर लोक संताप व्यक्त करत होते. त्यांच्या मते महामार्गावर त्याच ठिकाणी नियमितपणे अपघात होत असतात. परंतु, याबाबत पोलीस कोणतीही व्यवस्था करत नाहीत. प्रशासन सतर्क राहिल्यास असं अपघात होणार नाहीत, असं स्थानिकांनी सांगितलं.

# मित्रानेच काढला मित्राचा काटा; धारदार चाकूने गळ्यावर वार करून तरुणाचा खून

दैनिक आपला विदर्भ

**जालना । प्रतिनिधी :** जालना जिल्ह्यात गुन्हेगारीच्या घटनांमध्ये वाढ होत असल्याचे चित्र असतानाच आणखी एक धक्कादायक खून प्रकरण समोर आले आहे. जालना तालुक्यातील सिरसवाडी येथे मध्यरात्रीच्या सुमारास एका तरुणाची त्याच्याच मित्राने धारदार चाकूने गळ्यावर वार करून हत्या केल्याची घटना घडली आहे. या घटनेमुळे परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, सिरसवाडी येथील २६ वर्षीय निखिल वाघमारे हा आपल्या शेतातील घरासमोर झोपलेला असताना रात्री सुमारे १२ वाजताच्या सुमारास त्याचा मित्र तेथे आला. किरकोळ कारणावरून दोघांमध्ये वाद झाला. वाद चिघळल्याने आरोपीने संतापाच्या भरात धारदार चाकूने निखिलच्या गळ्यावर वार केला. गंभीर जखमी अवस्थेत निखिल रक्ताच्या थारोळ्यात पडला.





घटनेनंतर जवळच झोपलेल्या नातेवाईकांनी आरडाओरड करताच आरोपी घटनास्थळावरून पसार झाला. जखमी निखिलला तात्काळ जिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले; मात्र वैद्यकीय अधिकाऱ्यांनी तपासणीअंती त्याला मृत घोषित केले. ही बातमी समजताच कुटुंबीयांनी रुग्णालयात आक्रोश केला.

घटनेची माहिती मिळताच तालुका पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक संतोष साबळे यांनी घटनास्थळी भेट देत तपास सुरू केला. तपासादरम्यान गावातीलच एका विधी संघर्षग्रस्त अल्पवयीन मुलाने हा खून केल्याचे उघड झाले. पोलिसांनी काही तासांतच आरोपीला ताब्यात घेतले आहे.

प्राथमिक चौकशीत आरोपीने दिलेल्या माहितीनुसार, मृत निखिल वाघमारे हा आरोपीच्या आईला मोबाईलवर संदेश पाठवत असल्याच्या संशयातून हा प्रकार घडल्याचे समोर आले आहे. या घटनेमुळे जालना जिल्ह्यात वाढती गुन्हेगारी आणि अल्पवयीनांमधील गुन्हेगारी प्रवृत्ती याबाबत गंभीर प्रश्न निर्माण झाले असून कायदा व सुव्यवस्थेचा मुद्दा पुन्हा ऐरणीवर आला आहे.

वृत्तविशेष...

## खामगावजवळ ट्रकला भीषण आग; २५ लाखांचे नुकसान



दैनिक आपला विदर्भ

**खामगाव । प्रतिनिधी :** बुलढाणा जिल्ह्यातील पारखेड फाट्याजवळ शनिवारी एक धक्कादायक घटना घडली. शॉर्टसर्किटमुळे एका ट्रकला अचानक भीषण आग लागून संपूर्ण ट्रक जळून खाक झाला. या आगीत ट्रकमधील लाखोंची तूर जळून नष्ट झाली असून सुमारे २५ लाखांचे नुकसान झाल्याचा प्राथमिक अंदाज व्यक्त करण्यात येत आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, नांदुरा येथील व्यापारी भूषण राठी यांचा ट्रक धान्य बाजारातून तूर भरून दिल्लीकडे निघाला होता. दरम्यान, पारखेड फाट्याजवळ अचानक ट्रकमध्ये शॉर्टसर्किट होऊन आग लागली. प्रसंगावधान राखत चालकाने ट्रक रस्त्याच्या कडेला उभा करून तत्काळ उडी मारली, त्यामुळे मोठा अनर्थ टळला. घटनेची माहिती मिळताच पोलीस प्रशासन व अग्निशमन दल घटनास्थळी दाखल झाले. खामगाव व नांदुरा येथील अग्निशमन दलाच्या गाड्यांनी आगीवर नियंत्रण मिळवण्यासाठी प्रयत्न केले. दरम्यान, या घटनेमुळे खामगाव–अकोला मार्गावर काही काळ वाहतूक ठप्प झाली होती. सुदैवाने कोणतीही जीवितहानी झाली नसून, मात्र मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसान झाले आहे.

## प्रधानमंत्री उज्वला गॅस योजना; विस्तारीत टप्पा-२ व ३ मध्ये जिल्ह्यातील १६ हजार १७७ लाभार्थ्यांची जोडणी

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा। प्रतिनिधी :** केंद्र शासनाच्या अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाच्या आदेशानुसार प्रधानमंत्री उज्वला गॅस योजनेअंतर्गत अतिरिक्त गॅस जोडण्या मंजूर करण्याचा निर्णय घेतला आहे. त्याअनुषंगाने जिल्हा उज्वला समितीही स्थापन करण्यात आले असून प्रधानमंत्री उज्वला गॅस योजना विस्तारीत-२ व ३ मध्ये आतापर्यंत १६ हजार १७७ लाभार्थ्यांना जोडणी देण्यात आली आहे, अशी माहिती जिल्हा पुरवठा अधिकारी यांनी दिली आहे.

प्रधानमंत्री उज्वला गॅस योजनेअंतर्गत विस्तारीत योजना १ मध्ये बुलढाणा जिल्ह्यातील, १ लाख ८९ हजार ३४७ लाभार्थ्यांना लाभ मिळाला आहे. अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाच्या आदेशानुसार देशात विस्तारीत-२ मध्ये ७५ लाख तर विस्तारीत-३ मध्ये २५ लाख असे एकूण १ कोटी अतिरिक्त गॅस जोडण्या मंजूर करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यानुसार विस्तारीत-२ मध्ये ८ हजार ६९४ लाभार्थी तर विस्तारीत-३ मध्ये ७ हजार ४८३ लाभार्थी असे एकूण १६ हजार १७७ लाभार्थ्यांना जोडणी देण्यात आली आहे.

प्रधानमंत्री उज्वला गॅस योजनेचा मुख्य उद्देश आर्थिकदृष्ट्या दुर्बल कुटुंबातील महिलांना स्वच्छ, सुरक्षित आणि परवडणारे गॅस कनेक्शन उपलब्ध करून देणे हा आहे. तसेच पारंपरिक इंधनाचा वापर कमी करणे, महिलांचे व कुटुंबाचे आरोग्य सुधारणा, धूरमुक्त स्वयंपाकघर निर्माण करणे आणि पर्यावरण संरक्षणाला चालना देणे हेही महत्त्वाचे उद्दिष्ट आहे. ही योजना केवळ गॅस कनेक्शनपुरती मर्यादित नसून महिलांच्या सशक्तीकरणाचा एक प्रभावी सामाजिक उपक्रम आहे.

## मुंबईत आज मेगाब्लॉक

दैनिक आपला विदर्भ

मुंबई : मुंबईतील लोकल प्रवाशांना रविवारी पुन्हा एकदा मेगाब्लॉकचा सामना करावा लागणार आहे. मध्य रेल्वेकडून विविध अभियांत्रिकी आणि देखभाल कामांसाठी १२ एप्रिल रोजी उपनगरी मार्गांवर जम्बो मेगाब्लॉक जाहीर करण्यात आला आहे. त्यामुळे अनेक लोकल फेऱ्या उशिराने धावणार किंवा रद्द राहणार आहेत. मेन लाईनवर ब्लॉक – वेळ सकाळी १०.५५ ते ३ .५५ छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस ते विद्याविहार दरम्यान अप आणि डाऊन धीम्या मार्गावर सकाळी १०.४८ ते दुपारी ३.४५ वाजेपर्यंत मेगाब्लॉक राहणार आहे. या काळात धीम्या मार्गावरील गाड्या जलद मार्गावर वळवण्यात येतील. त्यामुळे काही स्थानकांवरील थांबे रद्द करण्यात आले आहेत.

# केंद्रीय राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांच्या प्रयत्नामुळे बुलढाणा जिल्ह्यातील ग्रामीण क्षेत्रातही नव्याने सुरु होणार १० राष्ट्रीयकृत बँकांच्या शाखा

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा। प्रतिनिधी :** जिल्ह्यातील विविध तालुक्यांमध्ये १० ठिकाणच्या ग्रामीण क्षेत्रांमध्ये नॅशनल बँकांच्या नविन शाखा सुरू करण्याबाबत केंद्रीय अर्थ मंत्रालयाने मान्यता दिली आहे. केंद्रीयमंत्री आयुष मंत्री (स्वतंत्र प्रभार) तथा आरोग्य व कुटूंब कल्याण राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी यासंदर्भात पाठपुरावा केला होता. त्यांच्या पाठपुराव्याला यश आले असून आता ग्रामीण भागामध्ये राष्ट्रीयकृत बँका सुरू होणार आहे.

ग्रामीण भागातील नागरिकांना राष्ट्रीयकृत बँकेची सेवा मिळावी या दृष्टिकोनातून राष्ट्रीय बँकेच्या अधिकाऱ्यां सोबत केंद्रीय राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी बैठक घेतली होती. या बैठकीत ज्या ग्रामिण ठिकाणी राष्ट्रीयकृत बँकाच्या शाखा नाहीत, अशा ठिकाणी राष्ट्रीयकृत बँकेच्या शाखा सुरु कराव्यात, असे निर्देशित केले होते. त्या अनुषंगाने केंद्रीय अर्थमंत्रालयाकडे मांगणी सुध्दा करण्यात आली होती. त्यानुसार आता




बुलढाणा तालुक्यातील सागवान आणि साखळी बुद्रुक चिखली तालुक्यातील इसोली आणि सवना खामगाव तालुक्यातील घाटपुरी आणि सुटाळा खुर्द मेहकर तालुक्यातील अंजनी बुद्रुक व देऊळगाव साकर्शा मोताळा तालुक्यातील कोथळी आणि संग्रामपूर तालुक्यातील टुनकी बुद्रुक येथे लवकरच राष्ट्रीयकृत बँकांच्या शाखा सुरू होऊन या भागातील नागरिकांना सेवा सुविधा मिळणार आहे.

पुर्वी जिल्हा केंद्रीय बँकेच्या जिल्हाभरात शाखा असल्याने शेतकऱ्यांना जिल्हा बँकेच्या वतीने विनासायास पिक कर्ज मिळत होते परंतु जिल्हा बँकेच्या शाखा बँक अवसायानात गेल्याने बंद पडल्या. त्यामुळे जिल्हयातील शेतकऱ्यांना पिककर्जासाठी खाजगी सावकारांकडुन अव्वाच्या सव्वा व्याजाने कर्ज घ्यावे लागते. जिल्हयामध्ये राष्ट्रीयकृत बँकाच्या शाखांची अजुनही गरज असल्याने जिल्हा बँकाच्या बंद पडलेल्या शाखांच्या ठिकाणी तसेच जास्त लोकसंख्यांच्या गावांमध्ये सर्वे करुन राष्ट्रीयकृत बँकाच्या शाखा सुरु करण्याबाबत प्रतापराव जाधव यांनी सदरहु बैठकीत निर्देश दिले आहे. त्या अनुषंगाने आता नव्याने सर्वे होवुन इतर बँकांच्या शाखा सुद्धा जिल्ह्यातील अनेक ग्रामीण भागामध्ये सुरू होणार आहे.

## प्रतापराव जाधव यांनी केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सितारामण यांचे मानले आभार!

बुलढाणा जिल्हयातील ग्रामिण व शहरी भागात नविन राष्ट्रीयकृत शाखांना केंद्रीय अर्थ मंत्रालयाने मान्यता दिल्याने ना.प्रतापराव जाधव यांनी केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सितारामण यांचे आभार मानले आहे.ग्रामीण भागातील जिल्हा बँकेच्या बंद झालेल्या शाखेच्या ठिकाणी तसेच मोठया गावात राष्ट्रीयकृत बँका सुरु करण्याची मागणी अर्थ मंत्रालयाकडे केली होती. या मागणीला मान्यता मिळाली आहे. त्यामुळे लवकरच या शाखा ग्रामीण क्षेत्रांमध्ये कार्यान्वित होणार आहे.



## खासदार नारायण राणे वाढदिवस साजरा

**कणकवली। प्रतिनिधी :** भाजपचे ज्येष्ठ नेते खासदार नारायण राणे यांचा ७४ वा वाढदिवस सिंधुदुर्गाच्या भूमीत मोठ्या दिमाखात साजरा झाला. या सोहळ्याला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी विशेष उपस्थिती लावली. यावेळी बोलताना फडणवीसांनी नारायण राणेंच्या विधानसभेतील दबदब्याचं सविस्तर वर्णन केलं. ते म्हणाले, विधानसभेत विरोधकांचे वाभाडे काढणे म्हणजे नेमके काय, हे आम्हाला राणे साहेबांच्या अमोघ वक्तृत्वामुळे पाहायला मिळाले. त्यांचा दरारा इतका मोठा होता की, ते समोरच्या बाकावर असूनही आम्हाला कधीच त्यांच्याकडून त्रास झाला नाही, कारण ते मनाने कायम आमच्यासोबतच होते.

राणेंच्या राजकीय शैलीचा हा गौरव सध्या राजकीय वर्तुळात चर्चेचा विषय ठरत आहे.

## जिल्हाधिकारी कार्यालयात महात्मा ज्योतिबा फुले यांना अभिवादन



दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा। प्रतिनिधी :** थोर समाजसुधारक महात्मा ज्योतिबा फुले यांच्या जयंतीनिमित्त जिल्हाधिकारी कार्यालयात आज निवासी उपजिल्हाधिकारी सुरेश कव्हळे यांनी त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.

यावेळी उपजिल्हाधिकारी सुरेश थोरात, नाझर गजानन मोतेकर, अपेक्षा इंगळे यांच्यासह जिल्हाधिकारी कार्यालयातील अधिकारी-कर्मचारी उपस्थित होते. उपस्थितांनीही महात्मा ज्योतिबा फुले यांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करुन अभिवादन केले.

## 'गाळमुक्त धरण, गाळयुक्त शिवार' योजनेची व्याप्ती वाढवणार उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे



दैनिक आपला विदर्भ

**सातारा । प्रतिनिधी** :'गाळमुक्त धरण, गाळयुक्त शिवार' ही योजना शेतकऱ्यांसह धरण क्षेत्रातील लाभार्थ्यांना खूप उपयोगी आहे. या योजनेची व्याप्ती राज्यात वाढवणार असल्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सांगितले.

जिल्हाधिकारी कार्यालय व नाम फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने कोयना धरणातील गाळ काढण्याचा कार्यक्रम हाती घेतला आहे याचा शुभारंभ दरे तालुका महाबळेश्वर येथे उपमुख्यमंत्री शिंदे यांच्या हस्ते झाला. याप्रसंगी जिल्हाधिकारी संतोष पाटील, उपवन संरक्षक अमोल सातपुते, वाईचे प्रांताधिकारी डॉ. योगेश खरमाटे, साताराचे प्रांताधिकारी आशिष बारकुल यांच्यासह विविध विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

उन्हाळ्यामध्ये धरणाची पाणी पातळी कमी होते. पाणी पातळी कमी झाल्यामुळे धरणातील गाळ काढल्यानंतर पाण्याची क्षमता ही वाढते व गाळाचा उपयोग शेतीमध्ये केला जातो. यामुळे शेती अधिक सुपीक व कृषी उत्पन्न जास्त देते. त्यामुळे ही योजना शेतकऱ्यांसह धरण क्षेत्रातील लाभार्थ्यांसाठी फार महत्त्वाची आहे. जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी धरणांमधील व तलावांमधील गाळ काढून तो आपल्या शेतात टाकावा व आपली शेत जमीन जमीन सुपीक करून कृषी उत्पन्न वाढवावे, असे आवाहनही उपमुख्यमंत्री शिंदे यांनी यावेळी केले.

कार्यक्रमाच्या प्रारंभी महात्मा ज्योतिराव फुले यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या प्रतिमेस उपमुख्यमंत्री शिंदे यांनी पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.

# जनगणना २०२७: बुलढाणा जिल्ह्यात तयारीला वेग;

## डिजिटल जनगणनेसाठी क्षेत्रिय प्रशिक्षकांचे प्रशिक्षण संपन्न







दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा। प्रतिनिधी :**आगामी जनगणना २०२७ ही पूर्णपणे कागदविरहित व डिजिटल पद्धतीने पार पडणार आहे. या पार्श्वभूमीवर बुलढाणा जिल्ह्यात प्रशासकीय तयारीने गती घेतली असून, जिल्हा स्तरावरील क्षेत्रिय प्रशिक्षकांचे (फिल्ड ट्रेनर) प्रशिक्षण नुकतेच यशस्वीरित्या पूर्ण झाले. जिल्हा स्तरावर दि. ६ ते ११ एप्रिल २०२६ या कालावधीत क्षेत्रिय प्रशिक्षकांसाठी विशेष प्रशिक्षण सत्रांचे आयोजन करण्यात आले होते. प्रधान जनगणना अधिकारी तथा जिल्हाधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली हे प्रशिक्षण तीन बॅचेसमध्ये घेण्यात आले. दि. १० एप्रिल रोजी जिल्हा नियोजन सभागृह, जिल्हाधिकारी कार्यालय येथे तिसऱ्या बॅचचे प्रशिक्षण पार पडले. यामध्ये २१ क्षेत्रिय प्रशिक्षार्थींना डिजिटल जनगणनेचे तांत्रिक बारकावे, ॲपचा वापर आणि प्रात्यक्षिके दाखवण्यात आली. मास्टर ट्रेनर संजय खडसे उपविभागीय अधिकारी, सिंदखेड राजा आणि डॉ. रामेश्वर पुरी उपविभागीय अधिकारी, खामगाव यांनी प्रशिक्षार्थींना सखोल मार्गदर्शन केले.

जनगणनेच्या कामात पारदर्शकता राहावी आणि पोर्टलवर काम करताना येणाऱ्या तांत्रिक अडचणींचे तात्काळ निराकरण व्हावे, यासाठी जनगणना संचालनालय, मुंबई यांच्या वतीने बुलढाणा जिल्हा समन्वयक म्हणून ऋषीकेश व-हाडे यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

प्रशासकीय सज्जतेचा आढावा घेण्यासाठी जिल्हा समन्वयक ऋषीकेश व-हाडे आणि नायब तहसीलदार (सा.प्र.) प्रमोद करे यांनी जिल्ह्याचा व्यापक दौरा केला. यामध्ये दि. ८ एप्रिल रोजी मोताळा येथील ग्रामीण व शहरी भागात, दि. ९ एप्रिल रोजी देऊळगाव राजा व सिंदखेड राजा येथे तर दि. १० एप्रिल रोजी मलकापूर, नांदुरा, खामगाव व शेगाव येथील ग्रामीण व शहरी भागांना भेटी देऊन मार्गदर्शन करण्यात आले. या दौऱ्यादरम्यान चार्ज अधिकारी स्तरावर ग्रामीण व शहरी भागातील प्रत्यक्ष कामांची पाहणी करून क्षेत्रीय कर्मचाऱ्यांना भेडसावणाऱ्या तांत्रिक समस्यांवर उपाययोजना सुचवण्यात आल्या. या डिजिटल उपक्रमामुळे जनगणना प्रक्रिया अधिक अचूक आणि वेगवान होण्यास मदत होणार आहे.